## निशाणी क्र. ४४ खालील आदेश

**१.** प्रतिवादी क्र. ३,८, व ९ यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचे विरूद्ध झालेला ''कैफियत -म्हणणे नाही / विना कैफियत चौकशी'' आदेश रद्द होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्जातील प्रतिवादीचे कथनानुसार, प्रतिवादी हे अशिक्षीत व शेतकरी असल्याने मिळकतीबाबतचे सन १९३३ पासूनचे जुने महत्वाचे उतारे व अन्य कागदपत्रे मुदतीत उपलब्ध न झाल्याने दाव्याच्याकामी हजर होवुन कौफियत दाखल करणेस विलंब झाल्याचे नमूद केलेले आहे. पुढे अर्जातील प्रतिवादींचे कथनानुसार प्रतिवादींनी मुद्दामहून अथवा हेतुपुरस्पर विलंब केलेला नसून प्रतिवादी यांना कैफियत देवून बचाव मांडण्याची संधी देणे गरजेचे असल्याने अर्ज मंजूर करावा अशी विनंती केलेली आहे.

**३.** प्रस्तूतच्या अर्जास वादीने आपले म्हणणे दाखल केले असून वादीचे म्हणन्यानुसार, प्रतिवादी यांच्या विरूध्द दिनांक २३/११/२०१८ रोजी कैफियत नाहीचा आदेश पारित झाला असून अर्जात नमूद कारणाबाबत कोणताही पुरावा याकामी दाखल केलेला नाही. तसेच सदरचा अर्ज प्रतिवादींनी सुमारे एक वर्षाने दाखल केलेला असल्याने मुद्दामहुन प्रतिवादींनी दाव्याचे कामी उशिर होवून वादीस न्याय मिळू नये याकरिता आपली कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादींनी प्रस्तूतचे अर्जात नमूद केलेल्या कारणाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नसल्याने अर्ज मंजुर करता येणार नाही.

**४.** प्रतिवादीचा अर्ज व त्यावरील वादीने दिलेले म्हणणे वाचले. वादी-प्रतिवादी वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा प्रतिवादी विरूद्ध दावा मिळकतीची मोजणी होवुन हद्द निशाण्या कायम करून मिळण्यासाठी, वाटप व निरंतर ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र. ३,८, व ९ यांच्या विरूद्ध अनुक्रमे दि. २३/११/२०१८ रोजी '' विना कैफीयत चौकशी'' आदेश पारीत झालेला दिसून येत असून त्यानंतर सुमारे एका वर्षापेक्षा जासत कालावधीच्या विलंबानंतर प्रतिवादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला असून अर्जात नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु, प्रतिवादी क्र. ३,८,

व ९ ची कैफियत दाव्याच्या कामी सामील करून न घेतल्यास दाव्यातील गुंतागुंत निश्चितच वाढणार आहे व दावा सर्व बाजूंचा न्यायीक विचार करून निर्गत करणे अडचणीचे होणार आहे. याउलट प्रतिवादी क्र. ३,८, व ९ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास दाव्यातील वादाचे निश्चित स्वरूप न्यायालयासमोर येवून दाव्यातील वाद निर्गत करणेस मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं. ३,८, व ९ यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणेस नैसर्गिक न्यायतत्वानुसार गरजेचे असल्याने प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब प्रतिवादी क्र. ३,८, व ९ यांना आपले म्हणने कैफियत दाखल करण्यास झालेल्या प्रदिर्घ विलंबाबाबत योग्य तो दंड आकारून अर्ज निर्गत करणे आवश्यक असल्याचे निर्णयाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**-: आदेश :-**

**१.** प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी नं. ३,८, व ९ विरूद्ध ''विना कैफियत चौकशीचा '' असा आदेश प्रत्येकी रक्कम रू. ३००/- चा दंड वादींना देण्याच्या अटीवर रद्द करणेत येतो. प्रतिवादी नं. ३,८, व ९ यांनी दिलेली कैफियत, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्या नंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

दिनांक : ०३/०२/२०२०.

पी. व्ही. सपकाळ
दिवाणी न्यायाधीश, जामखेड.